# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ५४ शुक्रवार दि.२९ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## मांजरा नदीचे रौद्र रूप; पाणी पात्राबाहेर

शिरूर अनंतपाळ : प्रतिनिधी–शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे उजेड आणि परिसरातील शिवारात मांजरा नदीचे रौद्र रूप पाहण्यास मिळत आहे. नदीपात्राबाहेर पाणी शेत शिवारातून वाहात आहे. मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसून येते आहे. सततच्या होणा–या पावसाने मांजरा नदीने रौद्र रूप धारण केले आहे. नदीचे पाणी पात्राच्या बाहेर पडले आहे. नदीकाठच्या शेतातील सोयाबीन, मूग पिकामधून पाणी वाहत आहे. सद्यस्थिती पाहता यापेक्षाही प्रचंड पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता आहे . त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. शेतीचे मोठे नुकसान झालेले दिसुन येते आहे.



## हेच मराठे तुम्हाला.; शिवनेरी किल्ल्यावरून मनोज जरांगेंनी फडणवीसांना दिला शब्द

राज्यात पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण मिळावे अशी आग्रही मागणी मराठा समाजाचे मनोज जरांगे पाटील यांनी लावून धरली आहे. त्यांनी पुन्हा एकादा मराठा आरक्षणासाठी आंदोलनाचे हत्यार उपसलं आहे.

२९ ऑगस्टला राजधानी मुंबईत आझाद मैदानावर त्यांना एक दिवस आंदोलन करण्याची परवानगी मिळाली आहे. आज ते पुणे जिल्ह्यात दाखल झाले असून त्यांनी जुन्नर तालुक्यातील किल्ले शिवनेरीवरून मराठ्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी करा, आडमुठी भूमिका सोडून द्या, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना म्हटलं आहे.

फक्त मराठाविरोधी भूमिका सोडा मी शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्यावरून सांगतो देवेंद्र फडणवीसांकडे योग्य संधी आहे. तुम्ही मराठ्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी करा हेच मराठे तुम्हाला मरेंपर्यंत तुमचे उपकार विसणार नाही, हा आमचा शब्द आहे, असं मनोज जरांने पाटील यांनी म्हटलं आहे. या संधीचं सोनं करा, तुम्ही आमचे वैरी नाहीत. फक्त मराठाविरोधी भूमिका सोडा, असंही जरांगे म्हणाले आहेत.

भूमिकेवर ठाम शिवनेरी किल्ल्यावर दाखल होताच मनोज जरांगे पाटील यांनी यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मराठ्यांच्या लेकरांच्या वेदनांना न्याय मिळाला पाहिजे, याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साथ दिली पाहिजे, असं म्हटलं आहे. याशिवाय आम्ही मुंबईला जाणारच असा ठाम निर्धार केला असल्याचं यावेळी त्यांनी बोलताना जरांगेंनी स्पष्ट केलं आहे. एका दिवसाची परवानगी म्हणजे चेष्टा २९ ऑगस्ट या दिवशी जरांगे यांना आझाद मैदानार एका दिवसाची आंदोलन करण्याची परवानगी दिली आहे.

## काँग्रेसचे निलंबित आमदार राहुल ममकुटाथिल यांच्या अडचणीत वाढ ! क्राईम ब्रांचकडून गुन्हा दाखल

पलक्कड (केरळ) : केरळमधील क्राइम ब्रांचने पलक्कडचे आमदार राहुल ममकुटाथिल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. क्राइम ब्रांचनेही या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. सोशल मीडियाद्वारे महिलांना त्यांच्या इच्छेविरुद्ध पाठलाग आणि छळ केल्याबद्दल राहुल यांची चौकशी सुरू आहे. महिलांना मानसिक त्रास दिल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्य पोलिसांनी बीएनएस ७८(२), ३५१ केरळ पोलिस कायदा १२०(०) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी तिरुवनंतपुरम येथे पत्रकार परिषदेत ममकुताथिल यांच्यावरील आरोपांबाबत सर्व शक्य कायदेशीर पावले उचलली जातील असे सांगितल्यानंतर काही तासांतच त्यांना काँग्रेसमधून निलंबित करण्यात आले होते. दरम्यान, केरळ विधानसभेचे अध्यक्ष ए. एन. शमशीर यांनी गुरुवारी सांगितले की, पलक्कडचे आमदार राहुल ममकुताथिल यांना संसदीय पक्षातून काढून टाकण्यात आले आहे की नाही याबद्दल काँग्रेस पक्षाकडून कोणताही अधिकृत संदेश आलेला नाही. याशिवाय, १५ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या विधानसभा अधिवेशनापूर्वी ममकुताथिल यांचा कोणताही रजा अर्ज प्राप्त झालेला नाही.



आमच्याकडे त्यांच्या निलंबनाचे फक्त मीडिया रिपोर्ट आहेत. ममकुताथिल यांना संसदीय पक्षातून काढून टाकल्याबद्दल काँग्रेसकडून अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही.भारतीय न्याय संहितेच्या कलम ७८(२) (पाठलाग) आणि ३५१ (गुन्हेगारी धमकी) आणि कलम १२० (ओ) (संवादाच्या कोणत्याही माध्यमाने, वारंवार किंवा अनावधानाने किंवा निनावी कॉल, पत्रे, लेखन, संदेश, ईमेल किंवा संदेशवाहकांद्वारे एखाद्या व्यक्तीला त्रास देणे) अंतर्गत राहुल ममकुटाथिल यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्यात आला आहे. तिरुवनंतपुरम रेंजची गुन्हे शाखा पुढील तपास करत आहे. डीएसपी सी. बिनुकुमार हे तपासाचे प्रभारी आहेत. प्रकरण काय आहे? मल्याळम अभिनेत्री रिनी एन जॉर्ज यांनी एका प्रमुख राजकीय पक्षाच्या युवा नेत्यावर गैरवर्तनाचा आरोप केल्यानंतर ममकुताथिल यांनी अलीकडेच युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. यामुळे भाजप आणि सीपीआय(एम) च्या युवा शाखेने, डीवायएफआयने निषेध केला होता. पक्षाच्या अंतर्गत चौकशीलाही त्यांना सामोरे जावे लागले होते. त्यानंतर अनेक महिला आणि एका ट्रान्सजेंडर व्यक्तीनेही असेच आरोप केले होते.

## मुंबई मराठा आरक्षण आंदोलनात पहिला बळी... केज तालुक्यातील वरपगावचे सुपुत्र सतीश देशमुख यांचे बलिदान...!

केज/प्रतिनिधी :- २९ऑगस्ट च्या मुंबई मराठा आरक्षणाचा पहिला बळी बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील वरपगावचे सुपुत्र सतीश ज्ञानोबा देशमुख यांच्या रूपाने गेला आहे. 'मराठा समाजाला आरक्षण मिळावे' यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत २९ऑगस्ट मुंबईत होणाऱ्या आमरण ऊपोषणासाठी गेलेल्या लाखो मराठा समाज बांधवासोबत सतीश देशमुख सहभागी झाले होते. बुधवारी सकाळी ते गावातील कांहीं सहकाऱ्यांसोबत मुंबईच्या दिशेने निघालेल्या रॅलीत सहभागी झाले होते. बुधवारी रात्री जुन्नर येथे मुक्काम झाल्यानंतर गुरुवारी सकाळी १०-०० वाजता ते आपल्या सहकाऱ्यासोबत आंघोळ नाष्टा आटोपून रॅलीत नारायणगाव मार्गे मुंबईच्या दिशेने निघाले होते. गाडीत बसून दहा मिनिटे प्रवास करताच त्यांचा वाटेत 'हार्ट अटॅक' ने मृत्यू झाला. सतीश देशमुख अत्यंत शांत,जिद्दी व प्रामाणिक स्वभावाचे होते. सतीश देशमुख यांच्या परिवाराला देशसेवेचा वारसा लाभलेला आहे. त्यांचे वडील ज्ञानोबा एकनाथराव देशमुख व लहान भाऊ व्यंकटेश ज्ञानोबा देशमुख हे भारतीय सैन्यदलात सेवारत होते. सध्याच्या मुंबई आंदोलनात भाऊ व्यंकटेश ज्ञानोबा देशमुख यांनी पुणे व बीड जिल्ह्यात गावोगावी फिरून मराठा बांधवांमध्ये आरक्षणाचे महत्व पटवून मोठी जनजागृती केली होती. यावेळी आपल्या मोठ्या भावाचे प्राण गमवावा लागतील याची कल्पनाही केली नसेल. या कुटुंबावर दोन वर्षात हा दुसरा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दोन वर्षापूर्वीच सतीश देशमुख यांच्या स्वप्नील नावाच्या मोठ्या मुलाचा विजेचा करंट लागून मृत्यू झाला होता. बेरोजगार असणारा स्वप्नील इतरांच्या ट्रॅक्टर वर काम करून कुटुंबाचा आधार बनू पाहत होता. ट्रॅक्टर वर काम करत असतानाच त्याचा मृत्यू झाला. सध्या सतीश देशमुख आपला दुसरा मुलगा शिवप्रसाद याला बारावी नंतरच्या पॉलिटेक्निक अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्याच्या विवंचनेत होते. कुटुंबाची परिस्थिती हलाखीची असल्याने व पॉलिटेक्निकच्या प्रवेशाचे मोठे शुल्क आवाक्याबाहेर असल्याने शिवप्रसादच्या पॉलिटेक्निक प्रवेशासाठी ते चिंतीत होते. मराठा आरक्षणामुळे तरी आपल्या मुलाला शिक्षणात सूट मिळेल या आशेने ते या मुंबई मराठा आरक्षणात सहभागी झाले होते.



हे दुःखद वृत्त कळताच संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मृत सतीश देशमुख यांचे लहान बंधू मराठा सेवक व्यंकटेश देशमुख यांना जवळ बोलावून त्यांचे सांत्वन केले व देशमुख कुटुंबाप्रती आपल्या संवेदना व्यक्त केल्या. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले. सतीश देशमुख यांच्या मागे आई, पत्नी संध्या, मुलगा शिवशंकर व लहान बंधू व्यंकटेश यांचा परिवार आहे. मयतसतीशदेशमुखहेअंबेजोगाईयेथीलप्रसिद्ध विधीज्ञ ड.माधव जाधव यांचे मेव्हणे आहेत. सतीश देशमुख यांच्यावर दिनांक २९ ऑगस्ट २०२५रोजी सकाळी ठीक ८-०० वाजता त्यांच्या मूळगावी वरपगाव ता. केज येथे अंत्यसंस्कार पार पडणार आहेत. त्यांच्या परिवाराच्या दुःखात सकल समाज सहभागी आहे. त्यांना सकल मराठा बहुजन समाजाच्या वतीने भावपूर्ण आदरांजली समर्पित होत आहे.

## भारतासाठी आनंदाची बातमी ! अमेरिका भारतावरील टॅरिफ काढण्यास तयार ; ट्रम्पने ठेवली 'ही' अट

भारत आणि अमेरिका यांच्यातील आर्थिक युद्ध आता चांगलेच पेटलेले दिसत आहे. कारण कालपासून अमेरिकेने भारतावर ५० टक्के टॅरिफ लागू केला आहे. त्यानंतर आता पुन्हा एकदा अमेरिकेकडून भारतावर थेट गंभीर आरोप करण्यात आले आहेत. यावेळी अमेरिकी डिप्लोमॅट आणि डोनाल्ड ट्रम्प यांचे सल्लागार पीटर नवारो यांनी भारत आणि रशियातील तेलाच्या कराराबद्दल धक्कादायक विधान केले आहे. त्यांनी म्हटले की, भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशियाची आक्रमकता वाढताना दिसत आहे. अमेरिकी टॅक्सपेयर्सचे यामुळे मोठे नुकसान होत आहे.

यासोबतच रशिया आणि युक्रेनच्या संघर्षाला 'मोदीचे युद्ध' म्हटले आहे. नवारो यांनी भारताला थेट धमकी देत, भारताने जर अजूनही रशियाकडून तेल खरेदी करणे बंद केले नाही तर भारताला वाईट परिणामांना सामोरे जावे लागेल. त्यांनी पुढे म्हटले, जर भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे बंद केले तर भारतावरील २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ हा रद्द केला जाईल. शांतीचा मार्ग हा भारताहून जातो असे त्यांनी म्हटले. भारतावर ५० टक्के टॅरिफ लावल्यानंतरही अशाप्रकारची विधाने ही अमेरिकेकडून येताना दिसत आहेत. भारतावरील २५ टक्के टॅरिफ काढण्यासाठी अमेरिका तयार आहे, पण त्यांनी मोठी अट भारताकडे ठेवली आहे. भारताने जर रशियाकडून तेल खरेदी बंद केले तर त्यांच्यावरील २५ टक्के टॅरिफ काढला जाईल. पुढे नवारो यांनी म्हटले की, मला एक गोष्ट खूप जास्त त्रासदायक वाटत आहे

## मतदानानंतर रेशन अन् आधारही हिसकावून घेणार ; राहुल गांधींची पुन्हा मोदी सरकारवर टीका

। बिहारमध्ये एसआयआर विरोधात विरोधकांकडून मतदार हक्क यात्रा काढण्यात आली आहे. रॅलीच्या १२ व्या दिवशी राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी सीतामढी याठिकाणी जानकी माता मंदिराला भेट देऊन त्यांच्या यात्रेला सुरुवात केली. यावेळी त्यांनी सीतामढीच्या जनतेला संबोधित करताना निवडणूक आयोग आणि भाजपवर निशाणा साधला. राहुल गांधी यांनी,आम्ही एकही मत चोरीला जाऊ देणार नाही. हे लोक आधी तुमचे मत घेतील, नंतर तुमचे रेशन कार्ड आणि नंतर आधारला लक्ष्य करतील असे म्हणत मोदी सरकारवर निशाणा साधला.



सीतामढी याठिकाणी जाहीर सभेला संबोधित करताना राहुल गांधी यांनी, आम्हाला माहिती आहे की ते बिहारमधील निवडणुका चोरण्याचा प्रयत्न करत आहेत. म्हणूनच आम्ही मतदार हक्क यात्रा सुरू केली आहे. निवडणूक आयुक्तांना हे माहित असले पाहिजे की बिहारचे लोक हुशार आहेत आणि एकही मत चोरीला जाऊ देणार नाहीत.असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.पुढे ते म्हणाले, मी दलित बांधवांना सांगू इच्छितो. स्वातंत्र्यापूर्वी तुमची काय अवस्था होती ते आठवा? तुम्हाला मारहाण झाली, तुम्हाला अस्पृश्य म्हटले गेले. संविधानाने तुम्हाला अधिकार दिले आहेत. भाजप तुमच्याकडून अधिकार हिसकावून घेऊ इच्छित आहे. ६५ लाख मते कापली गेली आहेत. त्यात एकाही श्रीमंत माणसाचे नाव नाही. ते गरिबांची मते चोरत आहेत. ते तुमचा आवाज दाबू इच्छितात. ते तुमचा आवाज कधीही दाबू शकणार नाहीत. आम्ही तुमच्यासोबत उभे आहोत. असे त्यांनी म्हटले.लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी म्हणाले, तुम्ही या यात्रेत तुमची सर्व शक्ती पणाला लावली आहे. लहान मुले येत आहेत, माझ्या कानात कुजबुजत आहेत की नरेंद्र मोदी मते चोरतात. कर्नाटकमध्ये, आम्ही भाजपने मते चोरल्याचे पुरावे देऊन दाखवले आहे. यापूर्वी मी कधीही असे म्हटले नाही की भाजप आणि निवडणूक आयोग मते चोरत आहेत. आतापर्यंत मी फक्त कर्नाटकचा पुरावा दिला आहे. येणाऱ्या काळात मी लोकसभा निवडणुका आणि हरियाणा निवडणुकीचा पुरावा देईन.

## मनपा आयुक्त श्रीमती मानसी मीना भर पावसात लातूर शहरात पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांची केली पाहणी







लातूर/ प्रतिनिधी: शहर व परिसरात सध्या सुरू असणाऱ्या जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर मनपाचे अधिकारी व कर्मचारी फिल्डवर सक्रिय आहेत. गुरुवारी(दि. २८) आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहरातील पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे करण्याचे आदेश दिले.

आयुक्त श्रीमती मानसी यांनी गुरुवारी अधिकाऱ्यांसह पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांची पाहणी केली. शहरातील इस्लामपुरा, मंत्री नगर, डी - मार्ट परिसरात रिंग रोडवरील मोठा नाला, उस्मानपुरा, अंबाजोगाई रस्त्यावरील पोलीस अधीक्षक कार्यालसमोरील नाला आणि जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वारासमोर जेथे पाणी साठते त्या ठिकाणांची पाहणी केली.या सर्व ठिकाणी पाणी थांबू नये यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. शहरातील सर्व नाले वाहते राहतील याची दक्षता घ्यावी, असेही त्या म्हणाल्या.

याप्रसंगी मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांचीही उपस्थिती होती.

मनपाचा आपत्कालीन विभाग २४ तास कार्यरत आहे. शहरातील नागरिकांना काही अडचण आली तर त्यांनी मनपाच्या ०२३८२-२५५५८५ या टोल फ्री क्रमांकावर किंवा आपत्ती व्यवस्थापन विभागाचे रवी कांबळे यांच्या ९९७०९६४४५३ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. नागरिकांच्या तक्रारींचे त्यामुळे तात्काळ निवारण करणे शक्य होईल, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## ज्येष्ठ अभिनेते बाळ कर्वे काळाच्या पडद्याआड; ९५ वर्षी घेतला अखेरचा श्वास

कलाविश्वातून एक दुःखत बातमी समोर आली आहे. ज्येष्ठ अभिनेते बाळ कर्वे यांच निधन झालं आहे. वयाच्या ९५ व्या वर्षी त्यांनी मुंबईत अखेरचा श्वास घेतला. बाळ कर्वे यांचा तीन दिवसांपूर्वी ९५ वा वाढदिवस साजरा करण्यात आला होता आणि आज त्यांच्या निधनाचं वृत्त आलं आहे.

बाळ कर्वे यांनी अनेक जुन्या सिनेमांमध्ये अभियन केला आहे. त्यांच्या अनेक भूमिका गाजल्या. याशिवाय त्यांनी टेलिव्हिजनवरील मालिका विश्वातही आपल्या अभिनयाचा ठसा उमटला. प्रेक्षकांनीही त्यांनी दखल घ्यायला भाग पाडलं. त्यांनी चिमणराव मालिकेत केलेली गुंड्याभाऊ ही भूमिका लोकांच्या मनात आजही घर करुन राहिली आहे. १९७९ च्या काळात चिमणराव गोंड्या भाऊ ही मालिका प्रसारित झाली होती.



कोण होते बाळ कर्वे? ज्येष्ठ अभिनेते बाळ कर्वे हे रंगीभूमी, सिनेमा आणि मालिका विश्वातील त्या काळात नावाजलेल्या कलाकारांपैकी एक होते. त्यांचा जन्म २५ ऑगस्ट १९३० ला झाला होता. चिमणराव गोंड्या भाऊ या मालिकेत त्यांची गुंड्याभाऊंची भूमिका त्यांनी अजरामर केली. बन्या बापू सिनेमातील त्यांची बापूची भूमिका देखील विशेष गाजली. याशिवाय राज्य शासनाच्या पुरस्कारांने त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं.

बाळ कर्वेंनी उंच माझा झोका, प्रपंच, महाश्वेता, वहिनीसाहेब, स्वामी या मालिकेत काम केलं होतं. आई रिटायर होतीये या नाटकासाठी त्यांना राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. चैत रे चैत, लपंडाव या त्याकाळी गाजलेल्या सिनेमातही त्यांनी आपलं कामाची चूणुक प्रेक्षकांना दाखवून दिली.

## संपादकीय

# देश झुकणार नाही

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेनुसार भारतावर अतिरिक्त २५ टक्के आयात शुल्क लागू झाल्याने भारतावर लावलेले एकूण शुल्क ५० टक्के झाले. या शुल्कवाढीने भारताच्या अमेरिकेतील निर्यातीला ४८ अब्ज डॉलर्सचा फटका बसेल, असा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वदेशीचा नारा देत पैसा कोणाचाही असो, उत्पादन भारतात व्हावे आणि त्याला आपल्या मातीचा सुगंध असावा, असे सांगत अमेरिकेला जोरदार प्रत्युत्तर दिले. रशियाकडून तेल खरेदी न थांबवल्यामुळे भारतातून अमेरिकेत निर्यात वस्तूंवर हा अतिरिक्त कर लावला गेला. खरे तर, अशाप्रकारचे अतिरेकी पाऊल ट्रम्प उचलणार नाहीत, अशी अपेक्षा होती; पण अमेरिकेने आता तशी औपचारिक अधिसूचनाही जाहीर केली.

देशांतर्गत गरजा भागविण्यासाठी भारताला रोज ५० लाख बॅरल्सपेक्षा जास्त तेल लागते. त्यापैकी ८५ टक्के तेल आयात केले जाते. भारत रशियाकडून एकूण गरजेच्या १/३ कच्चे तेल आयात करतो. जानेवारी ते जून या काळात भारताने रशियाकडून रोज सुमारे १७ लाख बॅरल्स तेल खरेदी केले. गेल्या वर्षी हे प्रमाण १९ लाख बॅरल्स होते; मात्र चार वर्षांपूर्वी भारत रशियाकडून रोज केवळ १ लाख बॅरल्स तेल आयात करत होता. पूर्वी भारत इराक, सौदी अरेबिया या पारंपरिक पुरवठादारांवर अवलंबून होता; मात्र रशिया–युक्रेन संघर्षानंतर अमेरिकेने रशियावर निर्बंध घातले. त्यामुळे रशियाने अमेरिका आणि युरोपला पर्याय म्हणून भारत व चीनला सवलतीत इंधन पुरवठा करण्यास सुरुवात केली. त्याचा भारताला फायदा झाला.

देशाची ऊर्जा सुरक्षा आणि राष्ट्रीय हित डोळ्यासमोर ठेवून सर्वात स्पर्धात्मक स्रोतांकडून तेल खरेदी सुरूच ठेवली जाईल, असे रशियातील भारतीय राजदूत विनयकुमार यांनी नुकतेच म्हटले आहे. त्यांचे हे वक्तव्य इंधन खरेदीबाबत देशाचे धोरण स्पष्ट करणारे आहे. रशियन कच्च्या तेलाच्या आयातीवरून अमेरिकेचा दबाव वाढत असताना भूमिकेवर ठाम राहत राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्धार भारताने पुन्हा व्यक्त केला. कोणत्याही आर्थिक दबावाला समर्थपणे तोंड देत पुन्हा उभे राहण्याचा निर्धार त्यामागे आहे. 'कितीही दबाव आणला, तरी त्याला तोंड देण्यास सक्षम आहोत. संकटकाळातही ताकद वाढवत राहू', असे उद्गार दंडात्मक शुल्क लागू होण्याच्या दोन दिवस आधीच पंतप्रधान मोदी यांनी काढले होते. छोटे उद्योजक, शेतकरी व पशुपालकांचे नुकसान होऊ देणार नाही.

आजच्या या जगात आर्थिक स्वार्थाचे राजकारण केले जाते. सर्वजण हितसंबंध जपत आहेत आणि आम्हीही ते जपत आहोत, असे त्यांनी ठणकावले होते. तुम्हाला भारताकडून तेल किंवा दुग्धोत्पादने खरेदी करण्यास अडचण असेल, तर खरेदी करू नका. तुम्हाला कोणीही जबरदस्ती करत नाही, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीही अमेरिकेला ऐकवले. खुद्द अमेरिका आणि युरोपमधील अनेक देश रशियासोबत व्यापार करत आहेत. अशावेळी भारताने स्वहित का जपू नये? भारत खरेदी करत असलेल्या तेलामुळे रशियास प्रचंड महसूल मिळतो आणि त्याचा वापर रशिया–युक्रेनमधील लष्करी कारवाईसाठी करत असल्याचा आरोप अमेरिकेने केला आहे. कोणत्याही देशाच्या महसुलात त्याच्या निर्यात व्यापाराचा वाटा असतोच.

अमेरिकेने यापूर्वी अफगाणिस्तान व इराकवर हल्ले केले. त्याचा खर्च अमेरिकेने कोणत्या देशातून आलेल्या महसुलातून केला, हे अद्याप कोणी विचारले आहे का? ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष पुतीन यांची १५ ऑगस्ट रोजी अलास्कामध्ये भेट झाली. यावेळी रशिया–युक्रेन संघर्षावर तोडगा निघण्याची अपेक्षा होती; पण काहीच निर्णय झाला नाही. २०२० च्या निवडणुकीनंतर ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये असते, तर युक्रेनमधील युद्ध सुरूच झाले नसते, अशा शब्दात पुतीन यांनी ट्रम्प यांना जरा चढवले! पण, ट्रम्प यांची कोणतीही मागणी त्यांनी मान्य केली नाही. त्यामुळे रशियाला घेरण्यासाठी अमेरिकेने भारतावर करांची कुर्हाड चालवली. अर्थात, औषधे, सेमीकंडक्टर्स आणि ऊर्जा संशोधनासारख्या काही क्षेत्रांमधून येणार्या मालास सूट दिली; पण या नव्या शुल्कामुळे कपडे, रत्ने, दागिने, चामडे, सागरी उत्पादने, रसायने, वाहनांचे सुटे भाग यासारख्या क्षेत्रांना झळ पोहोचू शकते.

भारत–अमेरिका द्विपक्षीय व्यापार करारावर अद्याप सहमती झालेली नाही. अतिरिक्त शुल्कामुळे त्याबाबत आता फार अपेक्षाही ठेवता येणार नाही. कृषी आणि दुग्धजन्य उत्पादन क्षेत्राची बाजारपेठ उघडा आणि त्यावरील कर कमी करा, यासाठी अमेरिका भारतावर दबाव आणत आहे; पण मोदी यांनी त्यास ठामपणे नकार दिला. आता या नव्या आव्हानास तोंड देण्यासाठी भारत युरोप, आग्नेय आशिया व आफ्रिकेतील देशांमध्ये निर्यात वाढवून व्यापार संतुलन ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे अमेरिकेवरील अवलंबित्व कमी होईल. चीन–भारताचे संबंध सुधारत असून, चीनमध्येही भारतास अधिकाधिक निर्यात करता येईल. शिवाय तेल खरेदीच्या बदल्यात रशिया भारताला बाजारपेठ खुली करून देण्याची खात्री देत आहे, ही नक्कीच आशादायक बाब आहे. भारत–रशियातील व्यापार वाढवण्यास खूप संधी आहे. दुसरीकडे भारत देशांतर्गत तेल खोदाई व उत्पादनावरही भर देत आहे. शिवाय अमेरिकेने आक्रमक पवित्रा मागे न घेतल्यास तेथून येणार्या मालावर भारतालाही ज्यादा कर लावता येतील. २०१९ मध्ये भारताने अमेरिकेकडून येणार्या बदाम, फळे व पोलादावर जादा शुल्क लावले होते. अमेरिकेच्या आयात निर्बंधांचा ज्या उद्योग क्षेत्रांना तडाखा बसेल, त्या –त्या क्षेत्रांना खर्च कमी करण्यासाठी भारत सरकार अनुदान देण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे जागतिक स्पर्धेस तोंड देता येऊ शकेल.

# राष्ट्रीय क्रीडा दिन ध्यानचंदचं अढळ स्थान !

राष्ट्रीय क्रीडा दिन हा विविध देशांमध्ये राष्ट्रीय क्रीडा संघ आणि त्या देशांच्या क्रीडा परंपरांचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जाणारा सार्वजनिक सुट्टीचा दिवस आहे. या दिवशी विविध वयोगटातील लोक खेळांमध्ये भाग घेतात. दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी भारतात हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या स्मरणार्थ जयंती दिवशी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. ध्यानचंद या दिवशी जन्मलेल्या सर्वकालीन महान हॉकी खेळाडूंपैकी एक. हा दिवस भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये तीनदा सुवर्णपदक जिंकणारे हॉकीपटू मेजर ध्यानचंद सिंग यांचा वाढदिवस आहे. त्यांच्या आत्मचरित्र 'गोल्स' नुसार त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत १९२६ ते १९४९ मध्ये ९०० गोल केले. त्यांनी त्यांच्या घरच्या आणि आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत १८५ सामन्यांमध्ये ५७० गोल केले. १९५६ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण, भारतातील तिसरा–सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला, त्याच वर्षी ते मेजर पदासह सैन्यातून निवृत्त झाले.

मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार हा भारतातील खेळ जगतातला सर्वात उच्च पुरस्कार आहे. ध्यानचंद पुरस्कार अधिकृतपणे क्रीडा व खेळांमधील 'ध्यानचंद जीवन गौरव पुरस्कार' हा खेळ जगतातील आजीवन कर्तृत्वासाठीचा भारतीय सरकार तर्फे देण्यात येणारा पुरस्कार आहे. १९२६ ते १९४८ या काळातील २० वर्षांपेक्षा जास्त कारकिर्दीत १००० पेक्षा अधिक गोल नोंदविणाऱ्या भारतीय हॉकीपटू ध्यानचंद यांच्या नावावर हा पुरस्कार देण्यात आला आहे. हा पुरस्कार दरवर्षी क्रीडा व युवा मंत्रालयाद्वारे सादर केला जातो. पहिला पुरस्कार हा २००२ साली देण्यात आला होता. ह्या पहिल्या पुरस्काराचे मानकरी होते शाहूराज बिराजदार (मुष्टियुद्ध), अशोक दिवाण (हॉकी) आणि अपर्णा घोष (बास्केटबॉल). दरवर्षी हा पुरस्कार ३ ते ५ खेळाडूंना देण्यात आला आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आम्ही भारतीय खेळाडूंच्या कर्तृत्वाचा गौरव करतो आणि आपल्या संस्कृतीतील खेळांच्या मूल्याबद्दल जागरुकता निर्माण करतो. याशिवाय मेजर ध्यानचंद यांच्या वारशाचा आणि भारतीय खेळांसाठीच्या त्यांच्या बांधिलकीचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशभरात अनेक क्रीडा उपक्रम होतात. वय, लिंग किंवा क्षमता पातळी विचारात न घेता, कोणीही या इव्हेंटमध्ये सहभागी होऊ शकतो. लोकांना खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि निरोगी आणि सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हे ध्येय आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनी प्रमुख ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान केले जातात. ज्या खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात अपवादात्मक कामगिरी केली आहे ते ही पारितोषिके मिळविण्यास पात्र आहेत, जे भारतीय क्रीडा क्षेत्रातील सर्वात मोठे सन्मान आहेत.

आंतरराष्ट्रीय हॉकीमध्ये मेजर ध्यानचंद हे दिग्गज होते. १९२८, १९३२ आणि १९३६ च्या उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून भारताच्या पहिल्या ऑलिम्पिक हॅट्ट्रिकमध्ये त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. ध्यानाला चांद म्हणून ओळखले जात असे कारण तो दिवसभराच्या नियमित कामानंतर रात्री हॉकीचा सराव करत असे. त्याच्या कलेबद्दलचे समर्पण दाखवून खेळाडूंचे आश्चर्यकारक पराक्रम आणि त्यांचा समाजावर खोल प्रभाव, त्यांच्या वचनबद्धतेची आणि अपवादात्मक कामगिरीची आठवण करून देणारा हा महत्त्वाचा दिवस आहे. क्रीडा जगतात अमिट छाप सोडणाऱ्या खेळाडूंनाही हा दिवस श्रद्धांजली अर्पण करतो.

राष्ट्रीय क्रीडा दिन हा थलेटिसिझम, सांघिक कार्य आणि खिलाडूवृत्तीचा देशव्यापी उत्सव असल्याचे वचन देतो. दिवंगत भारतीय हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांना सन्मानित करणाऱ्या या वार्षिक सोहळ्यात, सक्रिय आणि निरोगी जीवनशैलीला चालना देण्यासाठी खेळाचे महत्त्व मान्य करण्यासाठी देशभरातील समुदाय एकत्र येतील. यावर्षी राष्ट्रीय क्रीडा दिन तीन दिवसीय फिटनेस चळवळ म्हणून साजरा केला जाईल, ज्याचे नेतृत्व फिट इंडिया मिशन करेल. विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या मूल्यावर भर देण्यासाठी या वर्षीच्या उत्सवाचा भाग म्हणून अनेक रोमांचकारी कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातील. राष्ट्रीय क्रीडा दिन हा खेळाडूंच्या भावनेचा आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या महत्त्वाचा उत्सव आहे. संघटित होण्याची, आमच्या खेळाडूंना पाठिंबा देण्याची आणि क्रीडा नायकांच्या आगामी पिढीला प्रेरित करण्याची ही वेळ आहे. त्यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी, भारताने २०१२ मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनाची स्थापना केली. क्रीडा नायकाला श्रद्धांजली अर्पण करणे आणि शारीरिक तंदुरुस्ती आणि आरोग्यावर भर देऊन, दैनंदिन जीवनातील खेळांच्या मूल्याबद्दल जनजागृती करणे हे या उत्सवाचे उद्दिष्ट आहेत. या दिवशी, प्रमुख क्रीडा तारे भारताच्या राष्ट्रपतींकडून खेलरत्न, अर्जुन, द्रोणाचार्य आणि ध्यानचंद पुरस्कार यासारखे महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त करतात.



मेजर ध्यानचंद मैदानी हॉकीपटू हे आतापर्यंतचे सर्वोत्कृष्ट खेळाडू असल्याचे अनेकांचे मत आहे. ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी अलाहाबाद येथे कुशवाह राजपूत कुटुंबात झाला. ते रामेश्वर सिंह आणि शारदा यांचे पुत्र होते. मूल सिंग आणि रूप सिंग हे ध्यानचंद यांचे दोन भाऊ. नंतरचे एक हॉकीपटू तसेच, फील्ड हॉकीमध्ये भारतासाठी स्पर्धा केली आणि १९३२ आणि १९३६ ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदके जिंकली. चंदच्या वडिलांनी ब्रिटिश भारतीय सैन्यात सेवा दिली, जिथे ते हॉकी संघाचे सदस्य होते. चंद त्याच्या अपवादात्मक चेंडू हाताळणी आणि गोल करण्याच्या कौशल्यासाठी प्रसिद्ध होते. या विजयांच्या पलीकडे, त्याचा प्रभाव १९२८ ते १९६४ दरम्यान झालेल्या आठ ऑलिम्पिकमध्ये दिसून येतो, जिथे भारताने सात वेळा फील्ड हॉकी स्पर्धा जिंकली.

राष्ट्रीय क्रीडा दिन विविध स्पर्धा, क्रीडा कार्यक्रम आणि शाळा, महाविद्यालये आणि क्रीडा संघटनांमध्ये उपक्रमांसह साजरा केला जातो. इव्हेंटमध्ये वारंवार मॅरेथॉन, शाळांमधील फिटनेस स्पर्धा, थलीट श्रद्धांजली समारंभ आणि फिटनेस आव्हाने यांचा समावेश होतो. यावर्षी राष्ट्रीय क्रीडा दिनाची अधिकृत थीम अद्याप घोषित झालेली नाही, परंतु 'शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक समाजांना प्रोत्साहन देण्यासाठी खेळ' आणि 'एक तास, खेळाच्या मैदानावर' या सारख्या थीमचा उल्लेख वेगवेगळ्या स्त्रोतांमध्ये केला जात आहे. ही थीम थलेटिक्स सामाजिक बंधने कशी मजबूत करू शकतात, व्यक्तींना एकत्र आणू शकतात आणि सर्वसमावेशकता आणि शांतता वाढवण्यासाठी समुदायांना आवश्यक असलेली साधने कशी देऊ शकतात यावर प्रकाश टाकते. आज त्यांच्या १२० व्या जयंती निमित्त सर्वांना 'राष्ट्रीय क्रिडा दिनाच्या' हार्दिक शुभेच्छा !

जीवनाच्या या पथावर, थांबला तो संपला।
राहिला चालत निरंतर, तोच येथे जिंकला।।

**************


प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी :९९२३६२०९१९

# काडीमोडातील काटे भ .पुं .कालवे

काडीमोडातील काटे हा भ.पुं . कालवे यांची एका वेगळ्याच विषयावरची कादंबरी वाचण्यात आली. लेखकाचे नाव फारसे ऐकन्यात नव्हते, पण आमचे आदर्श, ग्रामीण कथा, कादंबरीकार बाबाराव मुसळे सरांचा फोन आला की कालवे सर तुम्हाला पुस्तक पाठवीत आहेत ते आवडल्यास वाचावे व त्यावर लिहावे. सुरुवातीस फक्त चाळायचं म्हणून हाती घेतलेलं पुस्तक थोडंसं वाचत असतानाच अक्षरशः मनात घर करून गेलं. जेव्हा वाचन करून पूर्ण झालं तेव्हा असं वाटलं की एक विलक्षण प्रवास नुकताच संपला... पुस्तकातील त्यांचेच 'चार शब्द आधीचे' मध्ये त्यांनी लिहिले 'घट रिकामा' ह्या पहिल्या पुस्तकानंतरचे हे दुसरे पुस्तक. पण कालवे यांची ही कादंबरी वाचत असताना हे नवखेपण कोठेही जाणवत नाही. त्यांच्या लेखनाची शैली अतिशय प्रवाही आणि प्रभावीही आहे. वाचक त्यात सहज गुंतत जातो. लेखकाचे नवखेपण जाणवत नाही.

काडीमोडासारख्या (फारकत) या विषयाकडे कोणी फारसे गांभीर्याने पाहत नाहीत, फारकतीच्या कार्याला जाणे टाळल्या जाते कारण हे काम काही सन्मान जनक समजल्या जात नाही. पण लेखकाने हा साधा विषय अतिशय उत्कंठेचा बनवला आहे. प्राध्यापक अशोक आणि उर्मिलाच्या संसाराची ही थोडक्यात अवधीतली (फक्त सात वर्षाची) पण खूप अस्वस्थ करणारी अतिशय गुंतागुंतीची, अनेक अडथळ्यांची ही कहाणी आहे. ग्रामीण भागातून अपार कष्ट, मेहनत, करून शिक्षण घेऊन प्राध्यापक झालेला अशोक तिवसे यांचे उर्मिला सोबत लग्न होते, पण अशोकच्या पेशाला न शोभणारे उर्मिलाचे वागणे, त्यात अशोक सारख्या संवेदनशील तरुणाची होणारी ससेहोलपट यांचे अस्वस्थ करणारे चित्रण लेखक कालवे यांनी या कादंबरीत अतिशय ताकतीने केले आहे. प्रा. अशोक, पत्नी उर्मिला, लहान मुलगी सुकन्या, अतिशय पाताळयंत्री सासरा या व्यक्तिरेखा भोवतीच ही कादंबरी फिरते आहे . उर्मिलाच्या एकंदरीत वागण्यावरून ती मंदबुद्धी विसरभोळी हेकट , संस्कारहीन, भांडखोर, कजाक प्रवृत्तीची वाटते, आणि इथेच संसारात अडथळ्याची सुरुवात होते. उर्मिलाच्या भांडखोर स्वभावामुळे सात वर्षात १३ भाड्यांची घरे अशोकला बदलावी लागली. उर्मिलाच्या अशा स्वभावामुळे दोन वेळा अशोकने काडीमोड घेण्याचा टोकाचा प्रयत्न केला. पण सोयऱ्याधाय–याच्या मध्यस्थीमुळे हे प्रसंग दोनवेळा टाळल्या गेले पण उर्मिलाच्या वागण्यात काहीही बदल झाला नाही. नोकरीच्या ठिकाणी (शिवाजीनगर) अशोक स्वतःचे घर बांधतो, सासरा ५० हजार रुपये घर बांधणीसाठी देतो. खरंतर उर्मिलाच्या आईचाच चार एकर जमिनीचा वारसा उर्मिलाला मिळतो पण जमीन सासराच बळकवून बसलेला आहे. ५० हजार रुपये देताना सासरा म्हणतो–– आपण जवळचं काय देतोय आपण 'म्हशीचा मु** म्हशीलाच पाजतोय' त्यातली थोडीसीच मदत अशोकला देतोय. अशोक सासऱ्यास म्हणतो–– तुमची गंजलेली सायकल (उर्मिलाला उद्देशून) एक दिवसही वागवण्याच्या लायकीची नाही, तरी मी सांभाळूनच राहिलोय. घर म्हणजे नुसतं विटा, सिमेंट, रेतीने बांधलेलं घर, ही घराची व्याख्या होऊ शकत नाही. असं असतानाही अशोकने काडीमोडाचा निर्णय सात वर्षे टाळला

मेंटल कृयल्टी या नावाने कोर्टात केस टाकण्याचे प्राध्यापक अशोकने नक्की केले. त्यासाठी त्यांनी नागपूरच्या वहिनीचा सल्ला घेतला. त्यांनी 'जुडिशियल सेपरेशनला' केस दाखल करायला सांगितले. जेणेकरून प्राध्यापक अशोक व कुटुंबीयांवर ४९८ लागणार नाही. लवकरच तडजोडीने काडीमोड व्हावा म्हणून अशोक चे वडील कारंजाला व्याह्याकडे गेले. कारंजात उर्मिलाच्या वडिलांनी त्यांना खूप धमक्या दिल्या त्याला अशोकचे वडील बधले नाही. एडवोकेट विजय मोटे नावाचे वकील अशोकने कोर्टाची केस लढवण्यासाठी लावले. काडीमोडाच्या विषयातले ते तज्ज्ञ वकील होते. केस दाखल होतात उर्मिलाच्या वडिलांचे षडयंत्र सुरू झाले अशोकचे मानसिक खच्चीकरण व्हावे, त्याची मानहानी व्हावी म्हणून त्याच्या सासर्याने महाविद्यालयातील प्रा.घाशिराम शिंदे याला आमिष देऊन त्यांच्या करवी प्राचार्य व दोन–तीन प्राध्यापकांना हाताशी धरून चांगल्या हॉटेलमध्ये दारू पार्टी, व जेवण दिले. प्रा. घाशीराम बिंदे याची या आधी पाच/ सहा कॉलेजनी हकालपट्टी केली होती. तो स्वतःला जागतिक कीर्तीचा समाजसेवक समजत होता. प्राचार्य, त्यांची पत्नी प्रा. घाशीराम बिंदे यांनी प्रा. अशोकला घरी बोलावून घटस्फोट न घेण्याविषयी दबाव टाकू लागले, नोकरीवर गदा येईल, नोकरीवरून काढून टाकले जाईल अशा धमक्या दिल्या. अशोक या धमक्यांना बधला नाही. प्राचार्यांनी डी. वाय. एसपी साहेब यांनाही कॉलेजला बोलावून घेतले. प्राध्यापक अशोकनी सर्व हकीगत त्यांना सांगितली. प्रकरण 'जुडीशियल सेपरेशन' मध्ये आहे असे समजतात डीवायएसपी म्हणाले हे प्रकरण घरगुती आहे त्याचा इथे कॉलेजशी काहीही संबंध नाही. ते निघून गेले पण या घडामोडी प्राध्यापक, विद्यार्थ्यांसमोर गेल्याच. पैशाने अशोकच्या वकिलाला फोडले पाहिजेत हा सासऱ्याचा प्रयत्न, मुलीसाठी अर्धा पगार मागायचा, घर मागायचे, मग त्याला घर बांधणीसाठी बँकेकडून घेतलेल्या कर्जाचा हप्ता फेडण्यात अडचणी येतील व तो काडीमोडाचा निर्णय मागे घेईल हा सासऱ्याचा तर्क होता. उर्मिला महाविद्यालयात जाऊन उपप्राचार्यकडून अशोकच्या खोलीचा पत्ता मिळवून त्याला त्रास देण्यासाठी, भांडण्यासाठी त्याच्या खोलीवर जाते. एवढ्या पातळयंत्री विचाराचे बाप आणि मुलगी होती. 'आग सतत भडकतच राहिली पाहिजेत, ती विझली नाही पाहिजेत, म्हणून आगीत तेलच ओतत राहायचे, 'मेरी मुर्गी एक टांग' असे नीच विचार सासऱ्याचे व उर्मिलाचे होते . तिचे वडील म्हणतात माहेरी कारंजाला चाल, तर ती म्हणते लग्ना आधीच माहेरात किंमत नव्हती, नवऱ्याने टाकल्यानंतर तर अजिबातच किंमत राहणार नाही हे तिला चांगल्या प्रकारे समजत होते.




उर्मिलाचे वकील डवोकेट रावराणे तिला केससंमंधी विचारपूस करतात तर यांच्यासमोर असंबंध बडबड करते. त्यांचा असिस्टंट म्हणतो–– 'पागल ये ही बाई, नक्की नक्की पागलये'(१२७) प्रा. अशोक चे वकील डो.विजय मोटे त्यांची मुलगी सुद्धा काडीमोडासाठी मध्यस्थी करण्यासाठी येते तिला अशोक सुनावतो 'आपल्या पायातला जोडा कुठे आणि कसा चावतो हे जास्त त्यालाच कळतं' वकिलाची मुलगी फणका–याने निघून जाते. उर्मिला अशोकच्या खोलीवर दोन वेळा जाऊन भांडण करते, सहकारी प्राध्यापकालाही सुद्धा खालच्या पातळीवरून बोलते. अशोकने पोलीस स्टेशनला तिच्या नावाचा रिपोर्ट दिला तेव्हा एपीआय म्हणतात पोलिसांच्या नथीतून तीर मारायचा असतो या प्रकरणात अशोकची पोलिसांकडून झालेली लुबाडणूक अस्वस्थ करणारी आहे. या दरम्यान उर्मिलाची ओळख नवोदित वकील गवशे सोबत झाली. तो उर्मिला सोबत तिच्याच घरात राहत होता. उर्मिलाचे वडील म्हणतात– त्याचं अन् हीचं जुगाड जमलं तर पुनर्विवाह होऊ शकतो. तो केस काळजीपूर्वक चालवेल , अशोकला शत्रू निर्माण होईल, पाचशे कोसावरच्या बापाला निश्चित राहता येईल. 'सुंठी वाचून खोकला जाईल'. आपल्याला उर्मिलाचं काही देणे घेणे नाही, आपण आपल्या जमिनीसहित कारंजाला सुखात आहोत. आपली पोरगी मूर्ख आहेच, दोन रेड्यांना परस्पर झुंजू द्यायचं ही जिंकेल नाहीतर तो जिंकेल नाहीतर दोघेही का मरेनात आपलं काय चाललं? 'गाव जळे अन् हनुमान बेंबी चोळे' हा सासऱ्याचा हेका होता. मग कसा काडीमोड होईल? हे प्रकरण मिटवून पोरीचं आयुष्य उभं करावं असं त्याला वाटतच नव्हतं. गवशे वकील व उर्मिलाला एकत्र पकडण्याचा कट अशोक पोलिसाच्या सहमतीने आखतो. रात्री घरावर धाड टाकतात पण गवशे वकील न सापडता फालतू भाडे करू सापडतो. तेव्हा कॉलनीतील लोक म्हणतात 'ज्याचा त्याला चोप नाही, आणि शेजाऱ्याला झोप नाही'. उर्मिलावर व्यभिचाराची केस दाखल होते. तिला व भाडेकरूला तहसिलदाराच्या कार्यालयात तारखा कराव्या लागतात. उर्मिलाची मैत्री एका भटक भवानी राजामती हावरे सोबत होते तिने पहिल्या नव–याला घटस्फोट देऊन दुसऱ्या नवऱ्यावर ४९८ ची केस दाखल केली. त्यासाठी पी एस आयलाच गंडवले त्यांच्याच माध्यमातून प्राध्यापक अशोक वरही ४९८ दाखल करायला लावली. अशोक चा वकील या ४९८ बद्दल उदासीन वाटला. कारण त्याचे इन्कम बुडाले असते. अशोक म्हणतो कोर्ट म्हणजे– 'शिक्षित बगळ्यांचा धंदा आहे' अशोकला कल्पना होती की कधीतरी आपल्यावर ४९८ दाखल होईल म्हणून त्याने आधीच डी. वाय. एसपी साहेबांना भेटून केस दाखल करता येणार नाही असा अर्ज दिला होता. उर्मिला तिचे वडील व मैत्रीण राजामती हावरे यांनी पोलिसाला चिरीमिरी देऊन सरकारी वकीलालाही पैसे देऊन केस दाखल करायला लावली. ठाणेदार वाळवे व ठाणेदार अन्सारी साहेब सज्जन माणसे होती त्यांनी प्राध्यापक अशोकला चांगले सहकार्य केले. मार्गदर्शनही केले. पोलीस स्टेशनला दोन अडीच तास बसवून ठेवून अटक दाखवीली, व कोर्टात पाठवून जमानती घ्यायला लावल्या. पण या प्रकरणात इतर पोलिसांचे भरपूर प्रमाणात हात ओले करावे लागले. अशा प्रकारे काडीमोडातील काटे अतिशय टोकदार, तीक्ष्ण झाले ,

खेड्यातून शिकून कर्त्या झालेल्या एका पिढीचा अशोक हा प्रतिनिधी आहे. त्यासोबतच तशाच व्यवस्थेतले अशोकचे सासरे नातलंग, माणसाचे शोषण आपलीच माणसे कसे करतात याचे वास्तव रुप म्हणून या कादंबरीकडे पाहता येईल. अतिशय अपरिपक्व व्यक्तिमत्त्वाची उर्मिला आणि तिचा गोतावळा यामध्ये अशोकची होणारी जीव घेणी फरफट यातल्या ताणाने ही कादंबरी व्यापलेली आहे. उर्मिला मंद बुद्धीची लेखकाने दाखवली आहे. बाथरूम मध्ये सोन्याची पोथ दोनदा विसरणे, सोन्याच्या बांगड्या डब्यातून चोरीला जाणे, अशोकला त्रास देण्यासाठी कॉलेजला जाणे, रूमवर जाऊन भांडण करणे, पोलिसांनी धाड टाकताच एसटीडी सेंटरवर जाऊन सामाजिक कार्यकर्त्या मैत्रिणींना फोन लावणे, एम एस ईबी ने वीजचोरी साठी धाड टाकताच कोरान्ने साहेबांना पकडून ठेवणे, अंगावरचा ब्लाऊज फाडणे ह्या समय सूचकता ती मंदबुद्धी असतांना कशा जमल्या? तसेच एवढ्या मानसिक ताण तणावामुळे अशोकच्या शिकवण्यावर काही परिणाम झाल्याचाही उल्लेख नाही हे थोडे खटकते. वकील आणि पोलिसा बद्दलच्या म्हणीचा चपलख वापर केला गेला आहे. 'ज्या गावच्या बाभळी, त्याच गावच्या बोरी' 'पोलिसाचे आणि आमच्या वकिलाचे संबंध कुत्र्या मांजरा सारखे असतात' वैवाहिक आयुष्यात अलीकडे शिरलेल्या जीवघेण्या हव्यासासाठी बायका नवऱ्याचे कसे शोषण करतात, नवऱ्याचे जीवन कसे फरपटत नेतात, कोर्टकचेरीतही खोटेनाटे बोलून बायका कसे काटे पसरवतात हेच या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. परिस्थितीनुसार योग्य म्हणीचा वापर ही एक जमेची बाजू आहे. एकूण २८ म्हणीचा वापर प्रसंगानुसार या कादंबरीत आलेला आहे असे आमचे मित्र (कोंडीबा भिसे यांनी ही माहिती दिली) गाजर गवताचा प्रतिकात्मक केलेला वापर आवडला. रविमुकुल यांचे मुखपृष्ठ अतिशय बोलके आहे . जीवनात काटेच काटे पसरवल्या गेल्यामुळे ,आणि त्याला ठामपणे सामोरे जावयाचेच हा ठाम निश्चय चेह–यावर दाखविला आहे.श्रीकांत देशमुख सरांची पाठराखण अप्रतिमच .आपल्या पुढील वाटचालीस, व साहित्य लेखनास हार्दिक शुभेच्छा

*************_

भास्कर सखाराम गायकवाड (माजी प्राचार्य )व्याड .ता. रिसोड.जि. वाशीम –९७६३४२२५१८

काडीमोडातील काटे .लेखक– भ .पुं कालवे . प्रकाशक– उत्कर्ष प्रकाशन पूणे .

# लातूर जिल्ह्यातील ३९ मार्गांवरील वाहतूक प्रभावित; रस्ते, पुलावरून पाणी वाहत असल्यास रस्ता, पूल न ओलांडण्याचे आवाहन






लातूर :- लातूर जिल्ह्यात २७ ऑगस्टच्या रात्रीपासून सुरु असलेल्या पावसामुळे नदी, नाले, ओढे यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. पुलावरून, रस्त्यावरून पाणी वाहत असल्याने जिल्ह्यातील जवळपास ३९ रस्त्यांवरील वाहतूक प्रभावित झाली आहे. त्यामुळे या मार्गांवरील वाहनांची वाहतूक तात्पूरती बंद करण्यात आली आहे. रस्ते अथवा पुलावरून पाणी वाहत असताना कोणीही वाहनासह किंवा स्वतः पूल ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. पूर प्रवण क्षेत्रात जाणे टाळावे, असे आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण मार्फत करण्यात आले आहे.

प्रभावित रस्त्यांची यादी-

माणकेश्वर - उदगीर मार्गावरील इंद्राळ येथील पुलावरून पाणी वाहत आहे,

बोटकुळ निलंगा मार्गावर पुलावरून पाणी वाहत आहे,

अतनूर येथील पुलावरून पाणी वाहत आहे, उदगीर-अतनूर-बाराळी रस्ता बंद आहे.

उटी व अलमला रस्त्यावर पुलावरून पाणी जात असल्यामुळे त्या मार्गावरील वाहतूक बंद आहे,

बैठना येथील पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे अजनी ते उदगीर वाहतूक बंद आहे,

औसा ते हसलगन रोडवर जवळगावाडी येथे पुलावरून पाणी जात असल्यामुळे सदर मार्गावर वाहतूक बंद आहे,

एकंबा येथील पुलावर पाणी आल्यामुळे सदर मार्गावरील वाहतूक बंद आहे,

धडकनाळ बोरगाव च्या पुलावर पाणी आल्यामुळे उदगीर ते देगलूर मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे,

मौ शेळगाव तालुका चाकुर मध्ये तिरु नदीवरील पुलावरून पाणी वाहत आहे,

सिंगनाळ ता. निलंगा येथील ओढ्याचे पाणी पुलावरून वाहत असल्याने सिंगनाळ येथील वाहतूक बंद आहे,

ढोरसांगवी गावचा संपर्क तुटला नदी वरून पाणी जात आहे,

उस्तुरी ते टाकळी ता. निलंगा येथील ओढ्याचे पाणी पुलावरून वाहत असल्याने उस्तुरी येथील वाहतूक बंद आहे,

हालसी (तु.) वरून तुगाव जाणाऱ्या रस्त्यावर नदीचे पाणी आल्यामुळे रस्ता बंद आहे,

वायगाव पाटी ते गादेवाडी तालुका अहमदपूर रस्त्यावरील पुलावरून पाणी वाहत आहे,

हासोरी खुर्द ते हासोरी बु ता. निलंगा जाणाऱ्या रस्त्यावर पुलावरून पाणी वाहत आहे रस्ता बंद आहे,

मौजे शेणकुड येथील पूल पाण्याखाली गेल्यामुळे बरेच दिवसापासून हा मार्ग बंद झाला आहे पण ढालेगाव आणि सांगवी सु असे दोन पर्यायी मार्ग चालू आहेत,

काल रात्रीपासून सुरू असलेल्या पावसामुळे नळेगाव सज्जातील हटकरवाडी एक या गावातील नदीला आलेल्या पुरामुळे हटकरवाडी ते नळेगाव हा रस्ता बंद झालेला असून पुलाच्या वरून दोन ते तीन फूट पाणी वाहत आहे,

नळेगाव ते लिंबाळवाडी रस्त्यावरील पुलावरून पाणी जात असून सदर रस्ता सुद्धा बंद झालेला आहे,

शिरूर अनंतपाळ ते हणमंतवाडी जाणारा पुल पाण्याखाली गेला आहे

मौजे दैठणा तालुका शिरूर अनंतपाळ येथील श्री व्यंकट शंकर सामानगावे यांच्या राहत्या घराची भिंत संततधार पावसाने दिनांक २८.०८.२०२५ रोजी पडली आहे,

अहमदपूर तालुका हासरणी ते उन्नी जांब रस्त्याच्या पुलावरून पाणी जात असल्यामुळे सदरील रस्ता बंद झाला आहे. पर्यायी रस्ता हाडोळती मार्गे आहे,

मौजे शिरूर अनंतपाळ ते नागेवाडी जाणारा घरणी नदीवरील पुलावरून पाणी वाहत आहे,

नळेगाव ते लिंबाळवाडी रस्त्यावरील पुलावरून पाणी जात असून सदर रस्ता सुद्धा बंद झालेला आहे,

मौजे धसवाडी येथील शेतकरी लक्ष्मण नामदेव गोजेगावकर याची गाय पाऊसामुळे नाल्यात आलेल्या पुरामुळे मयत झाली आहे,

आनंदवाडी सुनेगाव पुलावरून पाणी गेल्यामुळे सदरील रस्ता बंद झाला आहे. पर्यायी रस्ता उपलब्ध आहे,

औराद - वांजरखेडा नदीपात्रातील पुलावरून पाणी वाहत आहे त्यामुळे रस्ता बंद झाला आहे,

सोनखेड ता. निलंगा किटीअवेर पुलावरून पाणी,

औराद शहाजानी ता. निलंगा ते भालकी जाणाऱ्या रस्त्यावर भातंबरा गावात जवळ नदीचे पाणी रस्त्यावर वाहत असलेल्यामुळे रस्ता बंद झाला आहे

चिलवंतवाडी ते कासार बालकुंद रस्त्यावर पाणी असल्यामुळे गाडी बंद आहे,

शिरूर अनंतपाळ जवळ घरणी नदी ला पाणी आल्याने पुलावरून पाणी वाहत असल्याने सदर मार्गावरील

कानेगाव व टाकळी बसेस नळेगाव येरोळमोड मोड मार्गे मार्गस्थ करण्याचे सुचना आहेत.

वरवंटी ते शिंदगी च्या मधील पुलावरून पाणी जात आहे

लातूर - निजामाबाद मार्गावर नरसी येथे नदीपुलावरून पाणी वाहत असल्यामुळे वाहतूक बंद आहे,

उदगीर निझामाबाद मार्ग मुखेड नियत नरसी व बिलोली च्या मध्ये तळणी येथे रस्त्यावर पाणी आल्याने सदरची वाहतूक बंद आहे. त्यामुळे सदरचे नियत नरसी येथून परत बोलावले आहे,

शिरूर अनंतपाळ ते येरोळ-उदगीर जाणाऱ्या रस्त्याच्या पुलावरून पाणी वाहत असलेल्यामुळे रस्ता बंद झाला आहे,

शिरूर अनंतपाळ ते हणमंतवाडी जाणारा पुल पाण्याखाली गेला आहे रस्ता बंद झाला आहे,


शिरशी तालुका लातूर सरहद्द ते धानोरा ते ईजिमा-११५ रस्त्यावरील साखळी क्रमांक ०/७०० येथील नळकांडी पुलाजवळ भराव वाहून गेल्यामुळे रस्ता वाहतुकीस धोकादायक होऊन रस्ता बंद आहे,

औसा तालुका मौजे पोमादेवी जवळगा ते संक्राळ रस्त्याच्या पुलावर पुराचे पाणी आलेले आहे, वाहतुकीसाठी रस्ता बंद केलेला आहे,

जळकोट तालुक्यातील ढोरसंगवी आणि धनगरवाडी या गावाचा लाळी बु पुलावरून पाणी जात असल्याने सम्पर्क तुटला आहे,

# २९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिवस.

हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद राष्ट्रीय खेळांचे शिल्पकार. २९ ऑगस्ट १९०५ मध्ये मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला व सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे तेजोमय लखलखता तारा या भारत भुमित जन्माला आला आणि दैवी शक्तीच्या रूपात हॉकीचा शहनशहा निर्माण झाला.मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून संपूर्ण भारतात साजरी केली जाते.हा दिवस संपूर्ण खेळाडूंसाठी सुवर्ण दिवस आहे. मेजर ध्यानचंद हे कर्तबगार,जिद्दी आणि चीकाटी वृत्तीचे महान खेळाडू होते. त्यांच्या खेळाकडे संपूर्ण जगाचे लक्ष रहात होते. कारण त्यांच्या खेळण्यात मोठी जादू होती.त्यामुळेच त्यांना हॉकीचे जादुगार म्हणतात.मेजर ध्यानचंद यांच्या कारकिर्दीत १९२८, १९३२, १९३६अशा प्रकारे तिनं वेळा गोल्डन कामगिरी बजावुन देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य केले.यातुन ते संपूर्ण जगात हॉकीचे जादुगार म्हणून प्रसिद्ध झाले.आज आपल्याला देशात राष्ट्रीय खेळांचा जो बोलबाला आणि लौकिकता दिसत आहे. त्याचे संपूर्ण क्षेय मेजर ध्यानचंद यांना जाते आणि यातूनच देशातील खेळाडूंना मानसन्मान मीळत आहे. हॉकी सोबतच कबड्डी, भालाफेक, थाळी फेक, खो-खोसह अशा अनेक मातीतील राष्ट्रीय खेळांना मोठे स्थान मिळविले आहे.यामुळे खेळाडूंचे होसले बुलंद झाल्याचे दिसून येते. देशात खासदार क्रीडा महोत्स किंवा इतर माध्यमातून खेळांना महत्व देऊन खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण केली जाते.याच अनुषंगाने अनेक खेळांचे मोठ्या प्रमाणात आयोजन वेगवेगळ्या राज्यांमध्ये केले जाते. राष्ट्रीय खेळांना सकारात्मक भूमिका देण्याचे क्षेय मेजर ध्यानचंद यांच्या प्रयत्नातूनच साकार होत आहे. आपण पहातो की आज देशातील महत्वपूर्ण संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचले आहे. त्यामुळे आपण पहातो की आज राष्ट्रीय खेळांचा बोलबाला आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. कबड्डी हा राष्ट्रीय खेळ होता आता आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन पोहोचला आहे ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे.भारताने राष्ट्रीय खेळांमध्ये अव्वल स्थान मिळवून देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य देशाच्या खेळाडूंनी केले.त्यामुळे आपण समजू शकतो की राष्ट्रीय खेळ अत्यंत शक्तीशाली आणि महत्वपूर्ण आहेत. भारतीय खेळाडू देशात-विदेशात जावुण राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावुन सुवर्ण पदक, रौप्य पदक व कांस्य पदक प्राप्त करून तिरंग्याची शान उंचावतात.त्यामुळे देशातील तळागाळातील संपूर्ण खेळाडूंना माझा सलाम. कॉमनवेल्थ गेम, ऑलिंपिक खेळ, पॅराऑलिम्पिकमध्ये राष्ट्रीय खेळ मोठ्या प्रमाणात दिसून येते व राष्ट्रीय खेळांमुळेच आपण आज जगात आपली आगळावेगळी छाप सोडली आहे व पकड मजबूत केली आहे.याचाच आनंद देशातील १४० कोटी जनता नेहमी घेत असते. आज खेळांच्या बाबतीत असो वा अन्य बाबतीत संपूर्ण जग भारतासमोर नतमस्तक होतांना दिसते.याचे मुख्य कारण म्हणजे मेजर ध्यानचंद यांच्या सारख्या खेळाडूंनी घालून दिलेली जडणघडण व आपल्या पुर्वजांनी जे मातीतील खेळ आपल्याला शिकवीले त्यातूनच आज संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचल्याचे दिसून येते. त्याकाळी जगातील नामांकित व्यक्ती मेजर ध्यानचंद यांची हॉकी खेळण्याची कला पहाण्यासाठी उत्सुक असायचे.कारण लोकांना वाटायचं की त्यांच्या हॉकी स्टिकमध्ये चुंबक आहे की काय असे वाटत होते.१९३५ साली विश्वविख्यात क्रीकेटपटु डॉन ब्रॅडमन मेजर ध्यानचंद यांना भेटले.त्यांनी त्यांच्या हॉकीतील चेंडू वळवीचे सामर्थ्य पाहून कौतुक केले म्हणाले ध्यानचंदजी खरोखरच आपल्या खेळण्यात व खेळात जादू आहे.१९३६ साली बर्लिन येथे जर्मनीचा हुकुमशाह एडॉल्फ हिटलर हा हॉकीचा अंतिम सामना पहात होता.जर्मनी विरूद्ध भारत असा सामना होत असतांना भारताने जर्मनीचा ८ विरूद्ध १ गोलनी दनदणीत पराभव केला.हा खेळ पाहुण हिटलर आश्चर्य चकित झाले.




खेळ संपल्यानंतर हिटलरने मेजर ध्यानचंद यांना भेटीचे निमंत्रण दिले.या भेटीमध्ये हिटलरने मेजर ध्यानचंद यांचे खुप कौतुक केले व त्यांच्या खेळण्याची जादु पाहून जर्मनी सैन्यात मोठे पद देण्याची कबुल केले.परंतु मेजर ध्यानचंद यांचे राष्ट्रप्रेम सर्वोपरी होते. त्यामुळे मेजर ध्यानचंद यांनी हिटलरची ऑफर नाकारली व त्यांनी हिटलरला सांगितले की माझ्यासाठी माझी मातृभुमि महान.१९२८ ते १९६४ हे युग भारतीय हॉकीसाठी सुवर्ण युग मानल्या जाते. कारण या काळात आठ ऑलिंपिकमध्ये सात सुवर्ण पदक मिळाले होते हा भारतासाठी गौरवशाली इतिहास आहे.काही दिवसांपूर्वी महिला कुस्तीपटूंवर मोठा अन्याय झाला होता व न्याय मिळावा यासाठी खेळाडूंना रस्त्यावर यावे लागले ही चिंताजनक आणि गंभीर बाब आहे.त्यामुळे खेळाडुंच्या बाबतीत मी सरकारला विनंती करतो की देशातील कोणत्याही खेळाडूंवर अन्याय होत असेल तर त्याच्या विरोधात ताबडतोब कारवाई व्हायला हवी. कारण प्रत्येक खेळाडू देशाची आन-बाण-शान आहे.त्याचा मान-सन्मान सर्वच स्तरातून व्हायला हवा यात कोणत्याही प्रकारचे राजकारण नकोच. तेव्हाच खेळाडूंची मान उंचावेल. देशातील संपूर्ण तळागाळातील खेळाडूंना विनंती करतो की देशातील वाढते बदलते हवामान, वाढते तापमान, वाढते प्रदूषण व दिवसेंदिवस कमी होत असलेली ऑक्सिजनची मात्रा पहाता आज वृक्ष लागवड करणे अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे २९ ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवसाचे औचित्य साधून संपूर्ण खेळाडूंनी,सरकारनी,शाळा-महाविद्यालय व स्थानिक प्रशासनाने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे असे मला वाटते.कारण आज लावलेले वृक्ष अनंत काळापर्यंत जिवित राहिल व २९ ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवस सर्वांच्याच स्मरणात राहील. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार.
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

# लातूर जिल्ह्यातील शाळांना आज सुट्टी जाहीर

लातूर :- जिल्ह्यात गुरुवार रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे ६० पैकी २९ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी नोंदवली गेली आहे. या पावसामुळे नदी, ओढ्यांची पाणी पातळी वाढून रस्ते, पुलावरून पाणी वाहत असल्याने जवळपास ४९ रस्त्यांवरील वाहतूक बंद झाली आहे. आज, २९ ऑगस्ट २०२५ रोजी पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता लक्षात घेऊन हवामान खात्याने येलो अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या अध्यक्ष वर्षा ठाकूर-घुगे यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या शाळांना आज, २९ ऑगस्ट २०२५ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाने दिली.

# वॉटर प्युरिफायर पाण्यातली उपयुक्त खनिजं काढून टाकतं का?

पाण्याच्या शुद्धीकरणाचे जे विविध उपाय प्रचलित आहेत ,त्यामधील मागील दोन दशकांमध्ये प्रसिद्ध झालेला उपाय म्हणजे रिव्हर्स ऑस्मोसिस ,ज्याला आपण 'आर- ओ' या नावाने ओळखतो. वास्तवात प्रयोगशाळेमध्ये वैज्ञानिक प्रयोग करताना जेव्हा शुद्ध पाण्याची गरज असते, तेव्हा ते अधिकाधिक शुद्ध असावे या हेतूने आर-ओ पद्धतीने शुद्ध केलेले पाणी वापरले जात असे. प्रयोगशाळेप्रमाणेच विशिष्ट उद्योगधंद्यांमध्ये सुद्धा आर-ओ पाण्याचा उपयोग केला जात असे. पुढे १९६० च्या आसपास ज्या प्रदेशांमध्ये पाण्याची कमतरता असते व जे पाणी मिळते ते चवीला मचूळ लागते कारण ते जड म्हणजे खनिजयुक्त असते, असे पिण्यालायक नसलेले व आरोग्याला घातक असलेले पाणी शुद्ध करण्यासाठी आर-ओ पद्धतीचा उपयोग केला जाऊ लागला. दीर्घकाळ समुद्रामध्ये राहून प्रवास करणार्या जहाजांमधील लोकांना सुद्धा समुद्रामधील खारट पाणी शुद्ध करण्यासाठी आर-ओ शुद्धीकरण प्रक्रिया उपयुक्त सिद्ध होऊ लागली.

# शिल्लक राहिलेल्या ब्रेडपासून १० मिनिटांमध्ये बनवा मऊ रसरशीत गुलाबजाम, श्रावणात बनवा स्पेशल पदार्थ

सर्वच घरांमध्ये सकाळच्या नाश्त्यासाठी ब्रेड विकत आणले जातात. ब्रेड बटर किंवा ब्रेड चहा खाल्ले जाते. पण बऱ्याचदा विकत आणलेला ब्रेड शिल्लक राहिलेल्या ब्रेडपासून अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. ब्रेडपासून ब्रेड रोल, ब्रेड टिक्की आणि काही गोड पदार्थ बनवले जातात. पण आज आम्ही तुम्हाला ब्रेडचा वापर करून १० मिनिटांमध्ये गुलाबजाम बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. गुलाबजाम खायला सगळ्यांचं खूप जास्त आवडत. सणावाराच्या दिवसांमध्ये किंवा इतर कोणत्याही शुभ प्रसंगी घरात गोड पदार्थ बनवला जातो. खवा आणि मैद्याचा वापर करून गुलाबजाम बनवले जातात. श्रावण महिन्याला नुकतीच सुरुवात झाली आहे. या दिवसांमध्ये उपवास केले जातात. उपवासाच्या दिवशी नैवेद्यासाठी नेमकं काय बनवावं? हा प्रश्न सगळ्यांचं पडतो. त्यामुळे श्रावणातील उपवासाच्या दिवशी तुम्ही ब्रेडचे गुलाबजाम बनवू शकता. चला तर जाणून घेऊया ब्रेड गुलाबजाम बनवण्याची सोपी रेसिपी.




साहित्य:

- ब्रेड
- साखर
- केशर काड्या
- दूध
- काजूचे तुकडे
- तूप
- वेलची पावडर

कृती:

ब्रेड गुलाबजाम बनवण्यासाठी सर्वप्रथम, टोपात साखरेचा पाक तयार करण्यासाठी ठेवा. टोपात पाणी घेऊन त्यात साखर टाकून पाक बनवण्यासाठी ठेवा.

गुलाबजाम बनवण्यासाठी ब्रेडच्या चारही बाजूच्या कडा कापून घ्या. मोठ्या वाटीमध्ये ब्रेड घेऊन कुसकरून घ्या. त्यानंतर त्यात थोडस दूध घालून मिक्स करा. ब्रेडमध्ये दूध घातल्यानंतर काहीवेळ ब्रेड बाजूला ठेवा आणि त्यानंतर ब्रेड दुधात मिक्स करा. ब्रेड आणि दुधाचे मिश्रण व्यवस्थित मिक्स झाल्यानंतर गोळा तयार करा.

तयार केलेल्या पिठाचे छोटे छोटे गोळे करून कढईमधील गरम तुपात दोन्ही दोन्ही बाजूने भाजून घ्या.

तळून घेतलेले गुलाबजाम साखरेच्या पाकात टाकून काहीवेळा झाकण ठेवून तसेच ठेवा. यामुळे गुलाबजामंमध्ये पाक व्यवस्थित मुरेल.

गुलाबजाम थंड झाल्यानंतर सर्व्ह करताना वरून काजू बदामाचे बारीक बारीक तुकडे करून सर्व्ह करा.

# उपवासाला भूक लागते? मग बाहेरून कशाला आता घरीच बनवा कुरकुरीत बटाट्याचे चिप्स

श्रावण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. हा महिना व्रत-वैकल्यासाठी फार खास मानला जातो. श्रावण महिना भगवान शिवाला समर्पित केला जातो अशात अनेकांचा या महिन्यात उपवास असतो. आता उपवास म्हटलं की, यात बरेच खाद्यपदार्थ खाण्यास वर्ज्य केले जाते. साबुदाणा खिचडी, उसळ हे तर सामान्य पदार्थ आहेत. बऱ्याचदा उपवासात हलकी हलकी भूक लागली की अनेकजण बटाट्याच्या चिप्सचे सेवन करतात. हे कुरकुरीत चिप्स हलक्या भुकेसाठी आणि चवीसाठी एकदम परफेक्ट आहेत.



अनेकदा हे चिप्स बाहेरून खरेदी केले जातात मात्र आज आमही तुम्हाला हे कुरकुरीत बटाट्याचे चिप्स घरी कसे तयार करायचे ते सांगणार आहोत. हे चिप्स झटपट तयार होतात, कुरकुरीत लागतात आणि उपवासाच्या नियमांनुसार योग्यही आहेत. उपवासावेळी जर तुम्हाला हलकी हलकी भूक लागत असेल आणि स्नॅकिंगसाठी काही हवं असेल तर हे चिप्स तुमच्यासाठी एक चांगला पर्याय आहे. चला जाणून लगेच घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य:

कृती: यानंतर कापलेले बटाटे लगेच थंड पाण्यात टाका - यामुळे बटाट्यातील स्टार्च निघून जातो आणि चिप्स अधिक कुरकुरीत होतात.

१०-१५ मिनिटांनी बटाट्याचे चिप्स पाण्यातून काढून एका स्वच्छ कापडावर नीट वाळवा.

आता आता कढईत तेल गरम करा.

तेल चांगले तापल्यावर त्यात हळूहळू बटाट्याचे चिप्स घालून मध्यम आचेवर कुरकुरीत होईपर्यंत तळा.

चिप्स तळून झाल्यावर टिशू पेपरवर काढून घ्या, जेणेकरून जास्त तेल निघेल.

त्यावर सेंदू मीठ आणि थोडी मिरची पावडर टाकून नीट हलवा.

लक्षात तुम्हाला हे चिप्स मध्यम आचेवर तळायचे आहेत

अधिक कुरकुरीत चिप्ससाठी तळण्याआधी बटाट्याचे स्लाइस अर्धा तास उन्हात वाळवले तरी चालतात. हे चिप्स एका एअरटाइट डब्यात भरून २-३ दिवस टिकवता येतात.

# धडकनाळ बोरगाव येथील पूरग्रस्त भागाची माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांच्याकडून पाहणी

## ग्रामस्थांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभा असल्याची आमदार संजय बनसोडे यांची ग्वाही








उदगीर : काल रात्री पुन्हा अतिवृष्टीमुळे उदगीर मतदार संघातील धडकनाळ व बोरगाव या गावात पुराचे पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. यामुळे गावाचा संपर्क तुटला होता. यामध्ये पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे गावात पाणी शिरुन गावातील अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याची बातमी माजी मंत्री तथा उदगीर जळकोट मतदार संघाचे आमदार संजय बनसोडे यांना समजताच त्यांनी धडकनाळ व बोरगाव बु. या गावांना भेट देवुन पाहणी केली व तात्काळ पंचनामे करून ग्रामस्थांना मदत करण्याच्या सुचना आमदार संजय बनसोडे यांनी प्रशासनास दिल्या आणि ग्रामस्थांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभा असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

मागील आठवड्यात ही अशीच पुरग्रस्त परिस्थिती उद्भवुन गावाशेजारील जनावरांचे शेड व त्यामधील शेकडो शेळ्या व जनावरे वाहून गेली आहेत. विद्युत प्रवाहाचा डी.पी. व वाहने वाहून गेल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. त्यावेळी आपण प्रशासनाच सुचना देवून मदत कार्य चालु ठेवले होते. त्यावेळीही पंचनामे करण्यात आले होते. आता पुन्हा तशीच परिस्थिती निर्माण झाल्याने यावर आपण लवकरच तोडगा काढणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी उदगीरचे उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, कार्यकारी अभियंता रवींद्र महाव्दार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता अलका डाके, जलसंधारणचे रणजित नाईक, माजी जि.प. उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, श्याम डावळे, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब पाटोदे, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, ज्ञानेश्वर बिरादार येणकीकर, ज्ञानेश्वर पाटील रावणगाव, आदीसह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी घरे, शेती, गोठे, जनावरे, विहीरी, पाईपलाईन आदीसह नुकसान झालेल्या भागाची पाहणी करुन पंचनामे करण्याच्या सुचना आ.संजय बनसोडे यांनी दिल्या. त्यासोबतच गावाचे पुनर्वसण करण्यासाठीच्या उपाय योजना. नदी व नाला रुंदीकरण, सरळीकरण आणी खोलीकरण करण्यासाठी संबंधित विभागाला सुचना देवून परिस्थिती पूर्ववत होण्यासाठी मी स्वत: राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याशी बोलून सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन आ.बनसोडे यांनी दिले. यावेळी धडकनाळ, बोरगाव, वागदरी गावातील पुरग्रस्त परिस्थिचा आढावा अधिकाऱ्यासमवेत आ.संजय बनसोडे यांनी घेवुन मदत, उपाययोजना व पंचनाम्या संदर्भात येत्या ३ दिवसात अहवाल देण्याच्या सुचना दिल्या.

## बीडीओ यांच्या अहवालावरुन ग्रामपंचायत गंगापुर मधे भ्रष्टाचार झाला हे सिध्द – बाबू खंदाडे

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यवाही कडे लक्ष

लातूर :- ग्रामपंचायत गंगापुर ला सत्ताधारी सदस्यांच्या मदतीने लुटून खाल्ले हे तत्कालीन ग्रामसेवक रामचंद्र मलीले यांनी मान्य केले असा अहवाल गटविकास अधिकारी पंचायत समिती लातुर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातुर यांना पाठवला आहे, मागील तीन वर्षात ग्रामपंचायत गंगापुर ने अंगणवाडी साहित्य खरेदी मध्ये भ्रष्टाचार केला, आठ अ खोटे बनवले, स्मार्ट व्हीलेज मध्ये १० लाख रुपये मिळाले त्यात भ्रष्टाचार केला, ग्रामनिधीत भ्रष्टाचार केला यासंबधी कागदपत्रे ग्रामपंचायत सदस्य म्हणून बाबु खंदाडे यांनी मागितली तर दिली नाहीत, सदरील सर्व प्रकार बाबु खंदाडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देऊन तक्रार अर्ज दिला, त्यावर चौकशी होऊन गटविकास अधिकारी पंचायत समिती लातुर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातुर यांना अहवाल सादर केला आहे, त्यामध्ये सदरील तत्कालीन ग्रामसेवक रामचंद्र मलीले हे दोषी असल्याचे स्पष्ट लिहिले आहे. स्वतः तत्कालीन ग्रामसेवक रामचंद्र मलीले यांनी आरोप मान्य केले आहेत. यावरून ग्रामपंचायत गंगापुर येथे कसा भ्रष्टाचार चालू आहे हे लक्षात येते, या अहवालानुसार लवकरच कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी करतील पण जिल्हा परिषद च्या पंचायत विभागा हा सदर ग्रामविकास अधिकारी यांना वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी हे नवीन अधिकारी असल्याने त्यांच्या पासून अजुन बरेच प्रकरणाची माहिती गुपित ठेवली जात आहे. सदर प्रकारामध्ये ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांनी मिळून १ कोटी रुपये चा भ्रष्टाचार केला आहे त्याची आणखीन चौकशी पुर्ण करून कार्यवाही करावी अशी मागणी भाजपा कार्यकर्ते बाबु हणमंतराव खंदाडे यांनी केली आहे.

## संघर्ष अभ्यासिका आणि सिद्धार्थ तरुण मंडळ यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



तेल्हारा: तेल्हारा तालुक्यातील दानापुर या गावात संघर्ष अभ्यासिका व सिद्धार्थ तरुण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत प्रेरणा व मंगलकामना देण्यात आल्या. गावागावात वाचनायले सुरू झाले आणि त्याला तरुणांनी सहकार्य केले तर प्रत्येक गावात अधिकार निर्माण होऊन देशाचे सुसंस्कृत व जागृत नागरिक तयार होतील. विद्यार्थ्यांना प्रेरणा व शैक्षणिक कार्याला हातभार लावून विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविण्यासाठीच या अभ्यासिकेची सुरवात झाली आहे.

या कार्यक्रमाला अध्यक्षा म्हणून गावच्या सुशिक्षित सरपंच सपनाताई वाकोडे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून एम आर इंगळे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रशासकीय अधिकारी विनोद विरघट, जिवन डोंगरे,सुमेध घनबहादुर यांची उपस्थिती होती. एम आर इंगळे यांनी यशस्वी जिवनात पुस्तकाचे महत्त्व सांगुन विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नये असे सांगितले, विनोद विरघट सरांनी गुणवत्तेचा फायदा नोकरी मिळवणे व नोकरी चा फायदा समाजाचे कल्याण करण्यासाठी करावा असे मत व्यक्त केले, जिवन डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास व मेहनती शिवाय तरणोपाय नाही हे समजावून सांगितले, सुमेध घनबहादुर यांनी शिक्षणाने माणूस आर्थिक संपन्न तर होतोच पण सामाजिक संपन्न होतो. आणि सामाजिक संपन्न झालेले लोक समाजासाठी आदर्श असतात असे मत मांडले. या कार्यक्रमामध्ये पीयूष विरघट, प्रणव विरघट, भावेश विरघट, श्रेयांश पुडके,आदित्य वाकोडे, श्रीकांत दामोदर, समृध्दी विरघट, साहिल वाकोडे, रोहण वाकोडे, अंजली वाकोडे, अंशू वानखडे, प्रतीक्षा तायडे इत्यादींचा सत्कार केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिद्धार्थ तरुण मंडळाने मोलाचे सहकार्य केले. तर कार्यक्रमाचे संचालन दुर्योधन विरघट तर गोपाल विरघट यांनी आभार प्रदर्शन केले.

## बोरगाव बु येथिल पूरग्रस्त कुटुंबाना अन्नधान्याचे वाटप






उदगीर: प्रतिनिधी / दि १७ आगस्ट २०२५ रोजीच्या मध्यरात्री बोरगाव बु नदीला मोठ्या प्रमाणात पुर आल्याने गावचे आतोनात नुकसान झाले याच अनूशगां ने २७.आगष्ट.२०२५ रोजी मोजे बोरगाव तालुका उदगीर येथे द वर्ल्ड मिशन चर्च ऑफ गॉड तर्फे पूरग्रस्त बोरगाव येथील कुटुंबांना अन्न धान्य वाटप करून त्यांना या संकट समयी धीर देण्याचा प्रयत्न करण्यात आला . चर्च ऑफ गॉड ही एक इंटरनॅशनल संस्था आहे जी जगात १७५ पेक्षा जास्त देशामध्ये कार्य करते या चर्च ची स्थापना दुसऱ्यांदा आलेले ख्रिस्त आन सांग होंग यांच्याद्वारे इ. स . १९६४ मध्ये साऊथ कोरिया मध्ये स्थापन करण्यात आले व या वर्षी ६१ वा वर्धापन वर्ष साजरा करण्यात आला .बायबल द्वारे ख्रिस्ताने सांगितले आहे की.(तुमच्या शेजाऱ्यावर स्वतःसारखे प्रेम करा)या शिकवणी नुसार चर्च विविध प्रकारे प्रेम आणि सेवा करते आज पर्यंत चर्चने रक्तदान शिबिरे,पर्यावरण स्वच्छता, वंचितांना मदत करणे,भूकंप ग्रस्तान मदत,आपत्ती निवारण व सांस्कृतिक समृद्धी आश्या ३१,१०० हून अधिक उपक्रमांद्वारे जागतिक विकास आणि सुसंवाद साधण्यात योगदान दिले आहे.या निःस्वार्थ प्रयत्नांना जगभरातील सरकारे आणि संघटनांकडून ५,२०० पेक्षा जास्त पुरस्कार मिळाले आहेत.भारतात मागील १५ वर्षापेक्षा जास्त काळापासून विविध सामाजिक कार्यात सक्रिय योगदान दिले आहे.६० व्या वर्धापन दिनानिमित्त,चर्च ऑफ गॉड जागतिक समर्थक उपक्रम राबवत आहे.ज्या मध्ये प्लास्टिक फूट प्रिंट पुसून टाकाआणि फॉरेस्ट ऑफ होप तसेच असुरक्षित समुदायांना होल्ड होप मोहीम यांचा समावेश आहे या मोहिमेला सर्व स्तरांतून प्रशंसा मिळाली व पारितोषिके देऊन संस्थेचा सन्मान करण्यात आला.ही संस्था, चर्च उदगीर येथे ही मातांचा प्रेमाद्वारे २०१५ पासून कार्यरत आहे व उदगीर येथ स्वच्छता अभियान,रक्तदान,आपत्तीग्रस्तान मदत केली आहे.व आज च्या या कार्यक्रमाला उदगीर येथील नेते मा.जवाहरलालजी कांबळे यांच्या हस्ते बोरगाव येथील आपत्तीग्रस्त कुटुंबांना अन्न धान्य वितरण करण्यात आले संस्थेचे अध्यक्ष लिओ ,सुनीता विपुल भाताब्रेकर,सुनील म्हेत्रे,गवळण म्हेत्रे,अंकुश मोरे,मीना मोरे, श्वेत जामने,मुकेश जाधव,महानंदा सूर्यवंशी, सत्यकला जाधव,अनिकेत जाधव,संदेश कोंगे,राजकुमार सूर्यवंशी,मोहिनी कोंगे,दीपाली कोंगे,प्रवीण मोरे, यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले बोरगाव येथील पत्रकार श्री रामभाऊ जाधव यांचेही या कार्यक्रमास विशेष सहकार्य लाभले

## नाट्यपरिषद करंडक एकांकिका स्पर्धेत ड्रायवर ने मारली बाजी युवा जल्लोषात स्पर्धा पार




लातूर – अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्यावतीने आयोजित नाट्यपरिषद करंडक एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी लातूर केंद्रावर पार पडली. दि. २४ ऑगस्ट रोजी राजर्षी शाहू महा. च्या सभागृहात पार पडलेल्या या स्पर्धेत राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अमोल साळवे लिखित व अनील कांबळे दिग्दर्शीत ड्रायवर या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावत अंतिम फेरी गाठली आहे, असे परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी जाहीर केले.

दि. १५ ते १८ सप्टेंबर दरम्यान मुंबई येथे अंतिम फेरी पार पडणार असून लातूर केंद्रावर झालेल्या प्राथमिक फेरीत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदवला होता. मात्र यात सात संघांनी प्रत्यक्ष सादरीकरण केले. नाट्यपरिषदेच्या मध्यवर्ती शाखेच्यावतीने केवळ अंतिम फेरीत जाणाऱ्या एकांकिकेची निवड केली जाणार होती. परंतु लातूर महानगर शाखेच्यावतीने उर्वरित दोन क्रमांक व वैयक्तिक पारितोषिके जाहीर करण्यात आली. त्याप्रमाणे द्वितीय क्रमांक रसबहार संस्थेच्या मैं वारी जावा या एकांकिकेस तर तृतीय क्रमांक कलोपासक मंडळ या संस्थेच्या यथार्थ या एकांकिकेस मिळाला. दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक अनील कांबळे, द्वितीय अविष्कार गोजमगुंडे तर तृतीय अश्विन देसाई यांना मिळाले. पुरुष अभिनयाचे प्रथम पारितोषिक संदीप घुगरे, द्वितीय रवी आघाव तर तृतीय अशितोष खरवळे यांना तर स्त्री अभिनयाचे प्रथम पारितोषिक रिया गित्ते, द्वितीय क्षितिजा रसाळ तर तृतीय निकिता कोकाटे यांना मिळाले.

अतिशय रंगतदार झालेल्या या स्पर्धेचे परीक्षण तुळजापूरचे प्रा. संभाजी भोसले व सांगलीचे प्रशांत गोखले यांनी केले. या स्पर्धेचे केंद्र प्रमुख म्हणून ॲड. शैलेश गोजमगुंडे यांनी तर समन्वयक म्हणून प्रा. दिपक वेदपाठक व डॉ. मुकुंद भिसे यांनी काम पाहिले.विजेते संघ व कलाकारांचे बाळकृष्ण धायगुडे,नाट्य समीक्षक अनिल पुरी सुरेश गीर,बळवंत देशपांडे,भारत थोरात,विजय मस्के, प्रमोद कांबळे, अजय गोजमगुंडे,सुरेंद्र अपसिंगेकर, उदय गोजमगुंडे, व नाट्यपरिषदेच्यावतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ६२.८ मिलीमीटर पावसाची नोंद

लातूर :- जिल्ह्यात २८ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ६२.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये जळकोट तालुक्यात सर्वाधिक ७७.७ मिलीमीटर, तर उदगीर तालुक्यात सर्वात कमी ५० मिलीमीटर पाऊस झाला आहे. तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे– लातूर– ६०, औसा– ५७.३, अहमदपूर– ६२.९, निलंगा– ५०, उदगीर– ८६.९, चाकूर– ५१.७, रेणापूर– ६४.९, देवणी– ५९.२, शिरूर अनंतपाळ– ७२.७ आणि जळकोट– ७७.९ मिलीमीटर. पावसाची नोंद झाली आहे. तसेच २९ महसूल मंडळात ६५ मिलीमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE